# वसतीगृह प्रवेश : नियम व अटी

१. अवलंबित म्हणजे २५ वर्षा खालील न कमवणारी मुले व अविवाहीत मुली.

२. विद्यार्थी म्हणजे सेवारत/माजी सैनिकांचे अवलंबित, सेवारत सैनिकांची पत्नी व शिक्षण घेऊ इच्छित विधवा .

३. शैक्षणिक वर्ष म्हणजे प्रवेशाच्या दिनांकापासून ते वार्षिक परीक्षेच्या शेवटच्या दिवसापर्यंत.

४. वसतीगृह प्रवेश प्रक्रिया पुर्ण करणे तसेच वसतिगृह व्यवस्थित चालविणेकरीता प्रत्येक जिल्ह्यात मा. जिल्हाधिकारी व अध्यक्ष जिल्हा सैनिक कल्याण मंडळ यांच्या पुर्व मंजूरीने वसतिगृह व्यवस्थापन कमिटी स्थापन केली जाईल. सदर कमिटीमध्ये जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी हे अध्यक्ष तर एक सेवानिवृत्त अधिकारी, एक जे.सी.ओ. व एक जवान असे तीन सदस्य असतील.

५. वसतिगृह प्रवेशाचा अधिकार वसतिगृहाच्या क्षमतेनुसार व येथे नमुद नियम/अटींना अनुसरुन राहील. तसेच वसतिगृहात प्रवेश मिळाल्यानंतर एखादया विद्यार्थ्याचे वर्तन असमाधानकारक असेल तर सदर विद्यार्थ्यास वसतिगृहातून काढून टाकण्याचे अधिकार संबधित जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांना असतील.

६. अर्जदारांच्या तसेच प्रशासकीय सोईच्या दृष्टीने वसतिगृह प्रवेश प्रक्रिया ऑन लाईन करण्यात आली असून अर्जदारांनी त्यांच्या अर्जात नमुद केलेल्या तपशीलाच्या तसेच अर्जासोबत अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या आधारावर त्यांची पात्रता तपासून वसतिगृह प्रवेश/प्रतिक्षा यादी बनविण्याचे कार्य संबंधित जिल्ह्याच्या वसतिगृह व्यवस्थापन कमिटीव्दारा पुर्ण करुन त्याचा तपशील संकेतस्थळावर टाकला जाईल. तसेच एखादया माहितीअभावी तात्काळ निर्णय घेणे शक्य नसल्यास सदर अर्ज आक्षेपार्ह (Under observation) ठेऊन आक्षेप पुर्ण करण्यासाठी अर्जदारास एक आठवडयाची मुदत दिली जाईल. सदर कालावधीत आक्षेप पुर्ण न झाल्यास संबंधित अर्ज नामंजूर केला जाईल. वसतिगृह प्रवेशाकरीता कोणत्याही अर्जदाराची प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर मुलाखत घेतली जाणार नाही.

७. सबंधित जिल्ह्याच्या वसतिगृह व्यवस्थापन कमिटीव्दारा वसतिगृह प्रवेशाकरीता पात्र ठरविलेल्या विद्यार्थ्यांची यादी/प्रतिक्षा यादी कार्यालयात तसेच वसतिगृहाच्या नोटीस बोर्डवर लावली जाईल. तसेच सर्व अर्जदारांना SMS व्दारे व दुरध्वनीवर याबाबत सुचित केले जाईल.

८. सामान्यत: वसतिगृहामध्ये खालील प्राधान्यक्रमानुसार फक्त एका पाल्यास प्रवेश दिला जाईल. परंतु जागा शिल्लक असल्यास वसतिगृह व्यवस्थापन कमिटीच्या शिफारशीनुसार एकापेक्षा जास्त पाल्यांना प्रवेश देणेबाबतचा निर्णय घेतला जाईल :-

(अ) मागील शैक्षणिक वर्षामध्ये शैक्षणिक कारणाकरिता वसतीगृहामध्ये वास्तव्यास असलेले व ज्या अभ्याक्रमासाठी प्रवेश मिळाला होता तो अभ्यासक्रम अपूर्ण असलेले उत्तीर्ण किंवा ATKT मिळालेले पाल्य (सदर विद्यार्थ्यांना याकरीता पुनश्च अर्ज करणे आवश्यक राहील).

(ब) सर्व अनाथ पाल्य (विनामूल्य).

(क) युध्द विधवा आणि माजी सैनिकांच्या विधवा यांचे सर्व पाल्य (विनामूल्य).

(ड) पदव्युत्तर (व्यावसायिक), वैदयकिय, अभियांत्रिकी, व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर (इतर) या क्रमाने शिक्षण घेणारे पाल्य.

(इ) बी एड, डी. एड. या क्रमाने शिक्षण घेणारे पाल्य.

(ई) पदवी अभ्यासक्रम गुणवत्ता यादीप्रमाणे.

(उ) १२वी, ११ वी, १० वी या क्रमाने गुणवत्ता यादीप्रमाणे

(ऊ) माजी सैनिकाचे दुसरे व तिसरे पाल्य उपरोक्त प्राधान्यक्रमाप्रमाणे.

(ए) सेवा पुस्तकात नोंद नसलेले / Pt II Order न झालेले/माजी सैनिकांचे चौथे किंवा त्यापुढील क्रमाचे /वय वर्ष २५ वरील पाल्य (नागरी दराने) उपरोक्त प्राधान्यक्रमाप्रमाणे.

(ऐ) नागरी पाल्य उपरोक्त प्राधान्यक्रमाप्रमाणे.

(ओ) लहान कोर्स करीता प्रवेश घेणारे पाल्य उपरोक्त प्राधान्यक्रमाप्रमाणे.

(औ) सैनिकी मुला/मुलींच्या वसतीगृहाच्या ८ कि. मी. परीघात वास्त्व्यास असलेले माजी सैनिकांचे पाल्य उपरोक्त प्राधान्यक्रमाप्रमाणे.

९. वैद्यकीय अभियांत्रिकी, बी.एड, डी.एड. इत्यादी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया उशीरा सुरु होत असल्याने मागील शैक्षणिक वर्षात सदर अभ्यासक्रम करणारे किती विद्यार्थी वसतिगृहात वास्तव्यास होते त्याचा विचार करुन वसतिगृहाच्या क्षमतेच्या ५ ते १० टक्के जागा (वसतिगृह व्यवस्थापन कमिटीच्या निर्णयानुसार) नवीन विद्यार्थ्यांकरीता राखीव ठेवण्यात येतील.

१०. वसतिगृह प्रवेश फी एकत्रितपणे अथवा प्रत्येकी पाच महिन्यांच्या दोन सत्रात भरली जाईल. वसतिगृह प्रवेश कायम करणेस्तव रु १०००/- सुरक्षा अनामत रक्कम व किमान एका सत्राची फी भरणे अनिवार्य आहे. सदर फी संबंधित वसतिगृहाच्या खात्यात थेट भरुन चलनाची प्रत प्रवेशाचे वेळी वसतिगृह अधिक्षक/अधिक्षिका यांचेकडे जमा केली जाईल. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता वसतिगृह प्रवेश फी चे दर खालील प्रमाणे राहतील :-

| जिल्हे | सेवारत सैनिक | | | माजी सैनिक | | | सिव्हिलियन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अधिकारी ऑननरी कमिशन्ड अधिकारी | जे.सी.ओ. | शिपाई/ एन सी ओ | अधिकारी व ऑननरी कमिशन्ड अधिकारी | जे.सी.ओ | शिपाई/ एनसीओ | |
| मुंबई | १३०० | ११०० | ९०० | १२०० | १००० | ८०० | २२५० |
| पुणे | १३०० | ११०० | ९०० | १२०० | १००० | ८०० | |
| इतर सर्व जिल्हे | १००० | ९०० | ७०० | ९०० | ८०० | ६०० | |

११. जे विद्यार्थी वसतिगृह प्रवेशाच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत वसतिगृह प्रवेश रद्द करतील त्यांना त्यांनी भरलेली सुरक्षा अनामत रक्कम व फी ची रक्कम परत केली जाणार नाही.

१२. वसतिगृह प्रवेशाचे वेळी खालील कागदपत्रे/त्यांच्या छायांकित प्रती वसतिगृह अधिक्षक/अधिक्षिका यांचेकडे जमा केले जातील :-

(अ) बोनाफाईड सर्टीफिकेट (ऑन लाईन जमा केले नसल्यास)
(ब) वैद्यकीय प्रमाणपत्र
(क) सुरक्षा अनामत रक्कम ज्या बँक खात्यात हवी असेल त्या खात्याचा तपशील
(ड) दुचाकी वाहन वापरणेकरीताचे संमतीपत्र (लागु असल्यास)
(इ) वसतिगृहाच्या बाहेर राहण्यासाठीचा विनंती अर्ज (लागु असल्यास)

१३. उपरोक्त कागदपत्रे जमा केले नसल्यास वसतिगृहातील प्रवेश तात्पुरता राहील व सर्व कागदपत्रे जमा केल्यानंतरच प्रवेश कायम केला जाईल. तसेच सदर कागदपत्रे शैक्षणिक सत्र सुरु झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत जमा न केल्यास संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करुन प्रतिक्षा यादीतील पुढील विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाईल.

१४. अनुशासनहीनतेमुळे वसतिगृहातून कमी करण्यात आलेले पाल्य राज्यातील कोणत्याही सैनिकी वसतिगृहात पुर्नप्रवेशाकरीता अपात्र राहतील. तसेच अशा प्रकारे अपात्र ठरणाऱ्या पाल्यानी सदर माहिती लपवून पुर्नप्रवेश घेतलेले आढळल्यास त्यांचा प्रवेश तात्काळ रद्द केला जाईल व त्यांना त्यांनी भरलेली सुरक्षा अनामत रक्कम व फी ची रक्कम परत केली जाणार नाही.

१५. शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर वसतिगृहातील मोड-तोडीपोटी आकरण्यात येणाऱ्या दंडाची रक्कम (लागु असल्यास) वजा करुन उर्वरित सुरक्षा अनामत रक्कम उपरोक्त नियम क्र. १२ (क) मध्ये नमुद बँक खात्यात ई.सी.एस. व्दारे जमा केली जाईल. सदर खात्याचा तपशील चुकीचा असल्यामुळे अथवा खातेच बंद झाले असल्यामुळे सुरक्षा अनामत रक्कम खात्यावर जमा न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पालकांची राहील. अशा बाबतीतील उर्वरित रक्कम संबंधित वसतिगृह अधिक्षक/अधिक्षिका त्यांच्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या विशेष निधीत जमा करतील व पालकाकडून लेखी निवेदन प्राप्त झाल्यानंतरच ती परत केली जाईल.

१६. प्रशासकीय कारणास्तव सद्या देवरुख, जिल्हा-रत्नागिरी (मुलांचे), मालवण, जिल्हा-सिंधुदूर्ग (मुलांचे), सांगोला, जिल्हा-सोलापूर (मुलांचे), व पंढरपुर, जिल्हा-सोलापूर (मुलांचे) ही वसतिगृहे बंद असून पुरेशा विद्यार्थ्यांकडून त्यासाठीची मागणी झाल्यास ती चालु करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.